**नियमीत दिवाणी दावा क्रं. ५९/१९९२ मधील नि. १४८ खाली आदेश**

प्रस्तुत दावा वादीने प्रतिवादीविरुध्द ठराव व ताकिदीसाठी दाखल केला आहे.

०२. सदर दाव्यातील सदर दाव्यामध्ये वादीचे पूर्वीचे वकील यांनी अचानक वकीपत्र रद्द केलेमुळे मे. न्यायालयाने सदर दाव्यातील सर्व वादींना समज पाठविलेली होती. वादी मे. न्यायालयासमोर स्वतः हजर झालेनंतर वादी यांना समजले की, प्रतिवादी क्र. ३ हे दि. २७/१२/१९९१ रोजी मयत झालेबाबत वादीने पूर्वीचे वकीलांना त्यावेळी कळवले होते परंतु प्रतिवादी क्र. ३ यांचे मृत्युनंतर त्यांचे वारस रेकॉर्डवर घेण्याचे राहून गेले आहे. सदर प्रतिवादी क्र. ३ चे वारस रेकॉर्डवर घेणे गरजेचे आहे. सदर प्रतिवादी क्र. ३ चे वारस रेकॉर्डवर घेण्यास ३१ वर्षे १० महिने ६ दिवस एवढा उशिर झालेला आहे. सबब, सदर प्रतिवादी क्र. ३ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला उशिर माफ करण्यात यावा अशी विनंती वादी यांनी केली आहे.

०४. सदर अर्जावर मागील बाजुस प्रतिवादीने म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादीने असे नमुद केले आहे की, प्रतिवादी क्र. ३ हा १९९१ साली मयत आहे. वादीस मयताबद्दल पूर्ण माहिती आहे. झालेल्या उशिराबाबत कारण दिलेले नाही. सबब, सदरचा अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०५. वादींचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्र. ३ यांचे वारस असल्यास त्यांचा खटला दाखल करण्याचा अथवा विरोधी पक्ष राहण्याचा अधिकार हा जिवंत राहिला असल्याने त्या संदर्भात त्यांना रेकॉर्डवर घेण्याकरीता परवानगी न दिल्यास गुंतागुंत वाढू शकेल आणि अर्जाचा गुणदोषावर निर्णय देणेस अडचण निर्माण होईल. सदर कामी वादी प्रतिवादी क्र. ३ हे दि. २७/१२/१९९१ रोजी मयत झाले आहेत असे वादीने नमुद केले आहे. सदर प्रतिवादी क्र. ३ चा मयताचा दाखला नि.क्र. १४५ सोबत जोडलेला

आहे.

**०६.** प्रस्तुतच्या अर्जात नमुद केलेली कारणमिमांसा व दाव्यात निघुन गेलेला वेळ हे जुळून येत नसले तरी वादीचे वारस रेकॉर्डवर घेतल्यास दाव्याचे कामकाज गुणदोषावर चालविणे अधिकच सोयीचे होईल. वाया गेलेले वर्षाच्या वेळेबाबत भरपाई म्हणून वादी यांना भक्क्म कॉस्ट देणे न्यायोचित ठरेल. सबब, दाव्याचा अंतिम निर्णयाच्या कामी सुलभता येण्यासाठी तसेच वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद अंतिमरित्या संपुष्टात येण्याच्या दृष्टीने प्रतिवादी क्र. ३ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी झालेला विलंब माफीचा अर्ज कॉस्टसह मंजूर करीत आहे. वरील सर्व कारणांचा एकत्र विचार करुन खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

**आदेश**

१ प्रस्तुतचा अर्ज वादीवर रक्कम रुपये ३०००/– कॉस्ट बसवून मंजुर करण्यात आला.

२. प्रतिवादी क्र. ३ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यात आला.

३. कॉस्टची रक्कम भोर बार असोसिएशन ला देण्यात यावी.

NEHA K NAGARGOJE Digitally signed by NEHA K NAGARGOJE Date: 2024.07.06 11:30:15 +0530

दि.२९.०६.२०२४.
भोर .

(एन.के.नागरगोजे)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
भोर

## CERTIFICATE

"I affirm that the contents of this P.D.F file Order are same word for word as per original Order

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | – | Smt. S.A.Sonawane |
| Court Name | – | Hon'ble Smt. N.K.Nagargoje |
| Date of Order/Judgment | – | 29/06/2024 |
| Date of Sign Order/Judgment | – | 05/07/2024 |
| Order uploaded on | – | 06/07/2024 |